# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## मा. महासभा दि.२५ / ०७ /2022

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (94) :- शहरातील इमारतींना नळजोडण्या बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.**

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. यांच्याकडून 86 द.ल.लि. व महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळ यांच्याकडून 125 द.ल.लि. असा एकूण 211 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. परंतु मिरा-भाईदर शहरास प्रत्यक्षात सरासरी 185 ते 190 द.ल.लि. पाणी पुरवठा होत असून सरासरी 25 ते 30 द.ल.ली प्रतिदिन पाणी पुरवठा कमी होत आहे. सध्याच्या लोकसंख्येनुसार सरासरी 216 द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे.

सद्यस्थितीत शहरात मंजूर कोट्यापेक्षा अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने तसेच शटडाऊन व ब्रेकडाऊनमुळे पाणी पुरवठा खंडीत होत असल्याने शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत होत असतो. तसेच स्टेम प्राधिकरण यांच्या वितरण जलवाहीन्या सुमारे 35 ते 40 वर्षापुर्वी व महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) च्या वितरण जलवाहीन्या सुमारे 40 ते 45 वर्षापुर्वी टाकण्यात आलेल्या असल्याने वितरण जलवाहीन्या जिर्ण झालेल्या आहेत. त्यामुळे शहरात पुर्ण क्षमतेने व मंजूर कोट्यानूसार पाणी प्राप्त होत नाही. दरम्यानच्या काळात विविध राजकिय पक्षांमार्फत आंदोलन, मोर्चे काढण्यात आलेले होते. सद्यस्थितीत नवीन जलजोडणी मंजूरीस स्थगिती देणेकामी मा. आयुक्त महोदय यांनी आदेश पारित केलेले आहेत.

सद्यस्थितीत शहरास महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) व स्टेम प्राधिकरणामार्फत येणाऱ्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन करुन पाणी पुरवठयाचे सुरळीतपणे वाटप करण्यात आले आहे. तसेच MIDC ची कल्याण रोडवरील शिळफाटा ते कटई दरम्यान पाईपलाईन सारखी फुटते म्हणून नवीन पाईपलाईन टाकणेचे काम MIDC मार्फत हाती घेतलेले आहे. सदर काम युध्दपातळीवर पूर्ण होणे बाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कळविले आहे. सदरचे काम सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहे. सदर कामाकरीता MIDC मार्फत पुढील काही दिवसात अंदाजे 9 शटडाऊन घेण्याचे नियोजन असल्याचे MIDC मार्फत बैठकी दरम्यान सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे MIDC ने शटडाऊन घेतल्यास शहरातील पाणी पुरवठा पुन्हा विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मिरा-भाईंदर क्षेत्रात अतिरिक्त 75. द.ल.ली. पाणी पुरवठा योजना अंशत: कार्यान्वित झाल्याने शहराच्या पाणी पुरवठ्यामध्ये वाढ झाल्याने दि.30/04/2017 पासून नवीन नळजोडणी मंजूरी ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात आलेली होती. दि.30/04/2017 पर्यंत शहरात एकुण 33,892 इतक्या जलजोडण्या होत्या. त्यामध्ये 9,725 जलजोडण्यांची वाढ होऊन दि.20/10/2021 पर्यंत एकुण 43,617 इतक्या जलजोडण्या आहेत.

मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 403 द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास 218 द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. एम.एम.आर.डी.ए ने सदर कामाचा कार्यादेश मे. एल ॲण्ड टी यांना दिला असून योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. चेणे येथील संतुलन टाकी पासून मिरा भाईंदर शहरात पाणी आणणे व शहराअंतर्गत वितरण

व्यवस्था अंथरणे हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे. सदरचे उपलब्ध होणारे पाणी शहरात वितरीत करण्यासाठी आवश्यक असणारी वाढीव वितरण व्यवस्था, जलकुंभ व अनुषंगीक कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून सदर योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर केला आहे. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर मिरा-भाईंदर शहराचा पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.

सदर प्रकरणी विचार विनिमय होऊन अंतिम निर्णय होणेकरीता मा. महासभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे.

(दिलिप ढोले)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका